**विजय कृष्णा कुंभार**
अे–६, अनुपमा गृ. र. संस्था
बॉडिगेट
औंध, पुणे ४११००७
फोन ९९२३२९९१९९
दि. ७/६/२०११

प्रति,
मा. श्री. विकास देशामुख
जिल्हाधिकारी, पुणे

**<u>विषय :– अनधिकृत दगड खाणी</u>**

महोदय,

पुणे जिल्हयातील दगडखाणीची स्थिती भयावह आहे. जिल्हयात एकूण ६९२ मोठया व दीर्घ मुदतीच्या दगडखाणी आहेत. त्यातील जवळपास २०८ खाणींनी मुदतवाढ घेतलेली नाही. या जवळजवळ सर्व खाणींचे कामकाज शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुन चालले आहे. प्रदुषण, आरोग्य, आणि किमान वेतन इत्यादी सर्व बाबींचे उल्लंघन या खाणींचे मालक करत आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे खाणपट्टा धारकांनी कायदयाचे उल्लंघन केले असल्यास ते तपासण्याची व त्यावर कारवाई करण्याची कोणतीही यंत्रणा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नाही. कोणत्याही नियमभंगाबाबत एकही नोटीस आजतागायत एकाही खाणपट्टा धारकाला देण्यात आलेली नाही. इतकेच नव्हे तर खाणींचा परवाना दिल्यानंतर खाणपट्टा धारकाशी महिनोंमहिने जिल्हाधिकारी कार्यालयाने करारदेखील केलेला नाही.

एकटया हवेली तालुक्यात ४२८ दगड खाणी आहेत. त्यातील जवळजवळ १३५ खाणपट्टयांची मुदत संपलेली आहे. तरीही त्या खाणी सुरु आहे. विशेषत: वाघोली भावडी परिसरात खाणींची स्थिती चिंता करावी अशी आहे. मुदत संपलेल्या अनेक खाणी इथे सुरु आहेत. एका सर्व्हेक्षणानुसार या परिसरात १० ते १२ किमी वर्ग क्षेत्रात अनेक खाणी आहेत. त्यातील २५ टक्केपेक्षा जास्त खाणी बेकायदा आहेत. काही खाणी तर शासकीय जागेवर बिनधास्तपणे सुरु आहे. त्याकडे पूर्णत: दूर्लक्ष केले जात आहे.

हे खाणपट्टा धारक किती खनिजसपंती काढतात त्यातील किती रॉयल्टी शासनाकडे भरतात याची कोणतीही माहिती संकेत स्थळावर आढळून येत नाही.

शासनाच्या अटीनुसार खाणीचे क्षेत्र दाखविण्यासाठी हद्दीचे खांब लावणे बंधनकारक आहे. परंतु एकाही खाणपट्टाधारकांने तसेच खांब लावल्याचे दिसत नाही. त्याचप्रमाणे कोणताही अपघात होवू नये या साठी खाणधारकाने खाणीला कुंपण घालणे आवश्यक आहे. परंतु तसे कोणीही केलेले नाही. खाणीच्या ठिकाणी पाणी फवारणी यंत्रणा बसविणे व खाणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी मारणे, खाणीच्या मंजूर क्षेत्राच्या सिमेवर प्रति हेक्टरी ५० तसेच रस्त्याच्या कडेला २० फूट अंतरावर एक अशी झाडे लावणे आवश्यक आहे, मात्र एकही खाणपट्टा धारकांनी त्याचे पालन केलेले नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाची परवानगी खाण सुरु करताना घेणे आवश्यक असते. मात्र त्या संदर्भात काहीही माहिती आढळून येत नाही.

खरे तर या खाणी संदर्भातील सर्व माहिती आपल्या संकेत स्थळावर असणे आवश्यक आहे. मात्र आपल्या कार्यालयाच्या संकेत स्थळावर ही माहिती दिसत नाही त्यामुळे सामान्य माणसाला कोणती खाण कायदेशीर व कोणती बेकायदेशीर हे समजायला मार्ग नाही. म्हणून आम्ही या संदर्भात माहिती अधिकारात मिळालेली माहिती www.surajya.org या संकेत स्थळावर ठेवत आहोत.

वरील बाबींचा विचार करुन बेकायदेशीर सुरु असणाऱ्या खाणी बंद करुन त्यास जबाबदार असणाऱ्या खाण मालकावर व या सर्व बेकायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना कारवाई करावी ही विनंती.

कळावे

आपला

विजय कृष्णा कुंभार

अध्यक्ष, सुराज्य संघर्ष समिती

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
खनिकर्म शाखा
क्र खनिकर्म-SR-४८-९९
पुणे : दिनांक ६ । ६ । १०९९

प्रति,

श्री. विजय कृष्णा कुंभार
रा. A/६ अनुपमा को-ऑ. हौ. सोसायटी
बॉडीगेट औंध पुणे-७

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्ज.

संदर्भ :- आपला अर्ज दि. १८/५/९९.

महाशय,

उपरोक्त विषयाबाबतचे मुद्दा क्र. १ प्रमाणे अधिकृत खाणपट्टा धारकांची तालुक्याप्रमाणे यादी सोबत जोडून पाठविली आहे.

मुद्दा क्र. २ - या कार्यालयाकडून अधिकृत खाणपट्टा धारकांना नियमभंगाबाबत नोटिसा दिलेल्या नाहित.

अनधिकृत खाणपट्टा धारकांची माहिति कृपया तहसिल कार्यालयाकडून उपलब्ध करुन घ्यावी.

मुद्दा क्र. -३ या कार्यालयाकडून अधिकृत खाणी सक्तीने बंद केलेल्या नाहीत.

आपला विश्वासू

smaint ६.६.९९

अप्पर जिल्हाधिकारी पुणे करिता